# डॉ. बेंडाळे महिला महाविद्यालय विद्यार्थी परिषद 'सचिव पदी कु. ऐश्वर्या बडगुजर यांची निवड

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ पत्रकानुसार आज दि. ५ जानेवारी २०१८ रोजी डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय विद्यार्थी परिषद (Students Council) च्या 'सचिव' पदाची निवड प्राचार्य डॉ. एस. एस. राणे यांच्या अध्यक्षतेखाली व उपप्राचार्य बी. पी. सावखेडकर यांचे उपस्थितीत पार पडली. एकूण ३४ सदस्यांच्या महाविद्यालय विद्यार्थी परिषदेतून एकूण २७ सदस्य या निवडीसाठी उपस्थित होते. विद्यापीठाने दिलेल्या वेळापत्रकानुसार निवडणुक प्रक्रिया पार पाडण्यासाठी डॉ. स्मिता चौधरी, डॉ. अनिता कोल्हे, प्रा. सौ. नंदा बेंडाळे यांनी सहकार्य केले.

या निवडणुकीत चार नामांकन अर्ज प्राप्त झाले. त्यातील एक अर्ज अवैध ठरला. त्यामुळे कु. ऐश्वर्या परशुराम बडगुजर (T.Y.B.Com.), कु. सुषमा हनुमान ढेरे (T.Y.B.A.) आणि कु. माधुरी जगन्नाथ बारी (T.Y.B.A.) यांच्यात निवडणुक झाली. कु. ऐश्वर्या बडगुजर हिला २७ पैकी १७ मते पडून ती 'सचिव' पदी निवडून आली तर कु. ढेरे आणि कु. बारी यांना अनुक्रमे चार व सहा मते पडली. विजयी उमेदवाराचे प्राचार्य, उपप्राचार्य, विद्यार्थी परिषद सदस्य व सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी वृंदातर्फे अभिनंदन करण्यात आले.

